International Journal of Advanced Research and Multidisciplinary Trends (IJARMT)
An International Open Access, Peer-Reviewed Refereed Journal
Impact Factor: 6.4 Website: https://ijarmt.com ISSN No.: 3048-9458

# लीळाचरित्र : मध्ययुगीन स्त्रीजीवनाचा सामाजिक व सांस्कृतिक दस्तऐवज

**सोनाली सुनिल भागवत**
संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग, आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा, ता. आष्टी जि. बीड (डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर संलग्नित)
**डॉ. आर. टी. सोनटक्के**
असोसिएट प्रोफेसर, मराठी विभाग, एडवोकेट बी. डी. हंबर्डे महाविद्यालय, आष्टी ता. आष्टी जि. बीड (महाराष्ट्र)

**सारांश:**

महानुभाव पंथाचे प्रवर्तक चक्रधरस्वामी यांनी स्वतः कोणतेही लिखाण केले नाही, परंतु त्यांच्या जीवनातील आठवणी आणि प्रसंगांना त्यांच्या शिष्यांनी शब्दांत पकडले. या आठवणींच्या संग्रहालाच 'लीळाचरित्र' असे म्हणतात. मराठी साहित्यातील हा पहिला गद्य चरित्रग्रंथ मानला जातो. चक्रधरस्वामींच्या निधनानंतर (उत्तरापंथे गमन), त्यांचे सर्व शिष्य ऋद्धिपूर येथे एकत्र आले. तिथे स्वामींच्या आठवणींना उजाळा देताना म्हाईंभटांना हे चरित्र लिहिण्याची प्रेरणा मिळाली. त्यांनी नागदेवाचार्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महदंबा (महदाईसा) यांच्या मदतीने स्वामींच्या पूर्वायुष्यातील व इतर लीळा संकलित केल्या. या ग्रंथाची रचना साधारणपणे इसवी सन ११७८ च्या सुमारास झाली. लीळाचरित्राचे एकांक, पूर्वार्ध आणि उत्तरार्ध असे तीन मुख्य विभाग आहेत.

या ग्रंथाचे नायक चक्रधरस्वामी आहेत. ते एकांतातून लोकांतात कसे आले आणि त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्व कसे होते, याचे सुंदर चित्रण यात आढळते. या ग्रंथातून केवळ धार्मिक माहितीच मिळत नाही, तर त्या काळातील लोकांचे जेवण, कपडे, सण-उत्सव, चालीरीती आणि कायद्यांची ही माहिती मिळते. थोडक्यात, हा ग्रंथ तत्कालीन समाजाचा आरसा आहे. चक्रधरांसोबतच गोविंदप्रभू, नागदेव आणि महदंबा यांचीही प्रभावी स्वभावचित्रे म्हाईंभटांनी रेखाटली आहेत. यातील संवाद आणि वर्णने इतकी जिवंत आहेत की हा ग्रंथ एखाद्या कादंबरीसारखा वाचनीय वाटतो. लीळाचरित्राची भाषा ही यादवकालीन मराठीचा उत्तम नमुना आहे. म्हाईंभटांनी छोटी आणि अर्थपूर्ण वाक्ये वापरली आहेत. भाषेमध्ये साधेपणा असूनही ती अलंकारिक आणि प्रभावी वाटते. त्या काळातील म्हणी आणि वाक्प्रचारांचा वापर केल्यामुळे भाषेला एक वेगळीच गोडी आली आहे.

**मुख्य शब्द:** स्त्रीजीवन, महानुभाव, शिष्या भक्ती, गृहव्यवहार, आतिथ्य, शिष्टाचार, गुरुसंबंध, भय विश्वास, आरोग्यविषयक संकेत, मध्ययुगीन समाज इ.

**प्रस्तावना:**

लीळाचरित्रामध्ये स्त्रीजीवनाचे चित्रण केवळ एका मर्यादित चौकटीत न राहता, ते अत्यंत बहुआयामी स्वरूपात प्रकट झाले आहे. या ग्रंथात स्त्रिया केवळ घरकाम करणाऱ्या गृहिणी म्हणून येत नाहीत, तर त्या भक्त-शिष्या, आतिथ्य-व्यवस्थापक, आणि सामाजिक शिष्टाचारांचे पालन करणाऱ्या जागरूक घटक म्हणून समोर येतात. 'गुरूदेवासि पाठी दाखउ नये' सारख्या नियमांमधून त्यांच्यावरील धार्मिक अनुशासन स्पष्ट होते, तर 'बाइसी एकांती पुसीलें' यांसारख्या नोंदी त्यांच्या मनातील भीती, द्विधा मनःस्थिती आणि वैयक्तिक प्रश्नांना वाचा फोडतात. अन्नसेवा, आरोग्यविषयक चिंता आणि गुरुसंबंधातील आचारसंहिता या सर्व पातळ्यांवर स्त्रीचा सक्रिय सहभाग या ग्रंथात नोंदवला गेला आहे. थोडक्यात, लीळाचरित्र हा मध्ययुगीन स्त्रीच्या सामाजिक-धार्मिक भूमिकेचा आणि तिच्या अंतर्मनाचा वेध घेणारा पहिला महत्त्वाचा गद्यस्रोत आहे.

**'लीळाचरित्र' ग्रंथ परिचय:**

'लीळाचरित्र' हा ग्रंथ म्हणजे केवळ महानुभाव पंथाचे धार्मिक साहित्य नसून, तो मध्ययुगीन महाराष्ट्राच्या साहित्याचा आणि संस्कृतीचा अनमोल ठेवा आहे. या ग्रंथाच्या रचनेचे आणि स्वरूपाचे विश्लेषण खालीलप्रमाणे करता येईल,

हा ग्रंथ प्रामुख्याने तीन कालखंडांत विभागलेला आहे:

**एकांक:** यात स्वामींच्या एकाकी अवस्थेतील एकूण ७४ लीळा आहेत.

**पूर्वार्ध:** यात स्वामींच्या लोकजीवनातील प्रवासाच्या ३५८ लीळा आहेत.

**उत्तरार्ध:** यात स्वामींच्या उत्तर आयुष्यातील ४८८ लीळांचा समावेश आहे."[१]

अशा प्रकारे, साधारणपणे ९५० लीळांमधून श्रीचक्रधरस्वामींच्या जीवनाचा सर्वांगीण आलेख या ग्रंथात रेखाटला आहे.

ग्रंथातील स्वामींचे उद्गार आणि वचने ही महानुभाव पंथाची मूळ तत्त्वज्ञानपर सूत्रे मानली जातात. या ग्रंथाच्या लोकप्रियतेचे मोठे श्रेय चक्रधरस्वामींच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाला जाते. त्यांच्या सभोवतालच्या नागदेव, बाइसे, आउसे, सारंगपंडित आणि जानोपाध्ये यांसारख्या व्यक्तींची जिवंत स्वभावचित्रे यात पाहायला मिळतात.

'लीळाचरित्र' म्हणजे तत्कालीन महाराष्ट्राचे जिवंत चित्रण आहे. यात खालील बाबींचे सूक्ष्म दर्शन घडते, त्या काळातील चालीरीती, सणवार, व्रतवैकल्ये आणि वस्त्रप्रावरणे,

International Journal of Advanced Research and Multidisciplinary Trends (IJARMT)
An International Open Access, Peer-Reviewed Refereed Journal
Impact Factor: 6.4 Website: https://ijarmt.com ISSN No.: 3048-9458

खाण्यापिण्याचे पदार्थ, व्यापाराच्या पद्धती आणि तत्कालीन नाणी व लोकांचे मनोरंजन, नाणीगाणी आणि सामाजिक स्थितिगती.

नागदेवाचार्य आणि म्हाइंभट यांच्यातील संवादामुळे या ग्रंथाची निर्मिती झाली. म्हाइंभट हे केवळ संकलनकर्ते नसून, ते एक चतुरस्र, प्रामाणिक आणि भावनिष्ठ शैलीकार होते. त्यांच्या कष्टाळू वृत्तीमुळेच स्वामींच्या आठवणींना ऐतिहासिक आणि वाङ्मयीन मूल्य प्राप्त झाले. भाषा, इतिहास, समाजशास्त्र आणि तत्त्वज्ञान अशा सर्वच आघाड्यांवर हा ग्रंथ आजही प्रमाण मानला जातो. यादवकालीन मराठी भाषेचे वैभव समजून घेण्यासाठी 'लीळाचरित्र' हा सर्वश्रेष्ठ आधार आहे.

लीळाचरित्र हा प्रामुख्याने चक्रधरस्वामींच्या जीवनप्रसंगांचा संग्रह असला, तरी तो तत्कालीन समाजाचा एक जिवंत आरसा आहे. या ग्रंथाच्या अभ्यासातून असे लक्षात येते की, त्या काळातील स्त्री केवळ कुटुंबापुरती मर्यादित नव्हती, तर ती आध्यात्मिक क्षेत्रातही मोलाची भूमिका निभावत होती. चक्रधरांच्या सान्निध्यात येणाऱ्या स्त्रिया त्यांच्या 'भक्त' किंवा 'शिष्या' म्हणून जशा दिसतात, तशाच त्या घराचे व्यवस्थापन, पाहुणचार आणि सेवा-शुश्रूषा करणाऱ्या कुशल गृहिणी म्हणूनही वावरतात. स्त्रीचे प्रश्न, तिची सुरक्षा, आजारपणातील तिची भूमिका आणि वर्तनाचे नियम या सर्व बाबींमुळे लीळाचरित्रमधील स्त्रीजीवनाचा अभ्यास सामाजिक व सांस्कृतिक दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

**१) गुरुसंबंधातील शिष्टाचार व स्त्रीसाठी आचारनियम:**

“गुरूदेवासि पाठी दाखउ नये...
राजागुरूदेवता यांसि पाठि देवों नये.”[२]

मध्ययुगीन काळात गुरु-शिष्य नात्यात अत्यंत कडक शिस्त होती. स्त्री शिष्यांसाठी ही आचारसंहिता विशेष महत्त्वाची होती. गुरूसमोर बसताना किंवा तिथून निघताना 'पाठ न दाखवणे' हा केवळ एक शारीरिक नियम नसून तो अतीव आदराचा आणि विनयशीलतेचा भाग होता. यातून स्त्रीच्या वर्तनाला धार्मिक व सामाजिक अनुशासनाच्या चौकटीत बसवल्याचे दिसून येते.

ग्रंथातील शिष्टाचार-विषयक निर्देश स्त्रीसाठी आणि एकूण शिष्यवर्गासाठीही एक सांस्कृतिक अनुशासन घडवतात. ‘गुरूदेवासि पाठी न दाखवणे’सारखा नियम हा केवळ देहबोलीचा संकेत नाही; तो आदर, विनय आणि शिस्त या मूल्यांची प्रत्यक्ष कृतीतून जपणूक आहे. स्त्री अशा नियमांचे पालन करते, याचा अर्थ तिच्या वर्तनातून त्या काळातील संस्कार-व्यवस्था टिकवली जाते. हे अनुशासन काही ठिकाणी मर्यादाही घालते; पण त्याच वेळी समाजातील ‘संस्कृतीचे वहन’ स्त्रीच्या आचरणातून घडते, हेही स्पष्ट होते. म्हणूनच स्त्रीचा

शिष्टाचार हा तिच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग आणि समाजव्यवस्थेचा एक शिस्तबद्ध कणा म्हणून दिसतो.

**२) स्त्रीचा भक्तिभाव आणि अर्पण-परंपरा:**

"पाने पोफळे केळे नारिएळे दर्शन केली...
दंडवते घातली."[३]

चक्रधरांच्या दर्शनाला येताना स्त्रिया रिकाम्या हाती येत नसत. त्या आपल्या क्षमतेनुसार फळे, पाने, नारळ यांसारखी साधी सामग्री अर्पण करत. ही क्रिया त्यांच्या आर्थिक आणि मानसिक सहभागाचे प्रतीक आहे. भक्तीच्या क्षेत्रात स्त्रिया पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून सक्रिय होत्या, हे यावरून स्पष्ट होते.

स्त्रीचे धर्मजीवन *लीळाचरित्र*मध्ये निष्क्रिय नाही. फळे, नारळ, पाने इ. अर्पण, दर्शन, दंडवत, सेवा या कृतींमधून स्त्री स्वतःचे धार्मिक अस्तित्व ठसवते. 'दान' ही इथे केवळ वस्तू देण्याची कृती नसून सामाजिक मान्यता आणि आध्यात्मिक सहभागाची घोषणा आहे. ज्या काळात सार्वजनिक क्षेत्रावर पुरुषप्रधान नियंत्रण अधिक दिसते, त्या काळात भक्तीदानाच्या माध्यमातून स्त्रीने धार्मिक प्रवाहात स्वतःची जागा निर्माण करणे हे महत्त्वाचे ठरते. शिवाय, दान सेवा या माध्यमांतून स्त्रीचा 'धर्माधिकार' व्यक्त होतो, ती फक्त आदेश पाळणारी नाही, तर श्रद्धेचा सक्रिय वाहक घटक आहे.

**३) दैनंदिन गृहव्यवहार: पाणी–भात, स्वयंपाक, सेवा:**

"बाइः तुमतें पाणिभातु असे."[४]

या काळात 'पाणीभात' हा अतिशय सामान्य पण मुख्य आहार होता. अन्नाशी संबंधित सर्व जबाबदाऱ्या स्त्रियांकडे होत्या. या संवादातून त्या काळातील साधी आहारपद्धती आणि स्त्रियांचा रोजचा कष्टप्रद दिनक्रम प्रतिबिंबित होतो. गृहव्यवहारातील स्त्रीची भूमिका ही कुटुंबाच्या पोषणाशी थेट जोडलेली होती.

'पाणीभात' सारख्या साध्या उल्लेखांतून स्त्रीच्या दैनंदिन श्रमांचे वास्तव स्पष्ट होते. पण तेवढ्यावरच चित्र थांबत नाही. घरातील कामे करत असतानाही स्त्री प्रसंगानुरूप संवाद साधते, प्रश्न विचारते, निर्णयांमध्ये सहभाग घेते, आणि परिस्थितीनुसार व्यवस्थापन करते. म्हणजे श्रम आणि संवाद ही दोन वेगवेगळी क्षेत्रे नसून स्त्रीच्या जगण्यातील एकात्म अनुभव आहेत. त्यामुळे स्त्रीला 'घरकाम करणारी' या एका चौकटीत बसवणे ग्रंथाच्या आशयाला कमी पडते. *लीळाचरित्र* सूचित करतो की, स्त्रीची सक्रियता ही घरातील श्रमापुरती नसून सामाजिक व्यवहार, अतिथी संपर्क आणि धार्मिक संवाद यांमध्येही ती सहभागी आहे.

### ४) आतिथ्य व व्यवस्था: आसन, अन्न, तांबूळ:

“बाइसी जाडी आणिली:
आसन केलें.”[५]

गुरु किंवा अतिथी घरात येणे ही त्या काळातील केवळ भेट नव्हे, ती घराच्या प्रतिष्ठेशी, धर्माचाराशी आणि सामाजिक संबंधांच्या जपणुकीशी जोडलेली घटना होती. अशा वेळी बसण्याची योग्य व्यवस्था करणे, आसन मांडणे, पाणी देणे, आवश्यक असल्यास अन्न-पान-तांबूळ इत्यादींची तयारी ठेवणे ही सर्व कामे स्त्री अत्यंत तत्परतेने करते, अशी नोंद लीळाचरित्रसारख्या ग्रंथातून वारंवार सूचित होते. या तत्परतेचा अर्थ फक्त सेवा इतकाच मर्यादित राहत नाही, कारण अतिथीचे स्वागत, त्याची गरज ओळखणे, घरातील संसाधने वेळेत उपलब्ध करून देणे, आणि प्रसंगानुसार घरातील इतरांना समन्वयाने कामाला लावणे या सगळ्यात एक व्यवस्थापकाची दक्षता अपेक्षित असते.

म्हणूनच स्त्रीची भूमिका इथे काम करणारी इतकीच नाही, तर “काम चालवणारी” अशी दिसते. ती घरातील जागेचे नियोजन करते. कोण कुठे बसेल, कोणत्या प्रकारचे आसन योग्य ठरेल, वातावरणात आदर टिकून राहील याची काळजी घेते. ही काळजी म्हणजे घराच्या शिस्तीचे आणि सौजन्याचे संरक्षणच होय. अतिथीसमोर घराची प्रतिमा कशी उभी राहील, घरातील संस्कार कसे प्रकट होतील, आणि पाहुण्याला सन्मानाचा अनुभव कसा मिळेल या सर्व गोष्टींची जबाबदारी प्रत्यक्षात स्त्रीच्या कृतीतूनच पार पडते.

यातून आदरातिथ्याची संस्कृती ही घरात केवळ शिकवण किंवा नियम म्हणून नव्हे, तर प्रत्यक्ष व्यवहार म्हणून जपली जात होती, हे स्पष्ट होते आणि त्या व्यवहाराची मुख्य वाहक स्त्रीच होती. अतिथीचे स्वागत म्हणजे सामाजिक शिष्टाचार, धर्मभाव, आणि मानवी नातेसंबंध यांचे एकत्रित प्रदर्शन, ते अचूकपणे घडवून आणण्यासाठी लागणारे कौशल्य स्त्रीकडे होते. त्यामुळे स्त्रीला फक्त सेवाभावी म्हणणे अपुरे ठरते. ती घराच्या प्रतिष्ठेची रक्षक, परंपरेची वाहक आणि परिस्थितीचे कुशल व्यवस्थापन करणारी ‘कार्यक्षम व्यवस्थापक’ म्हणूनच लीळाचरित्रच्या संदर्भात अधिक अर्थपूर्णपणे समोर येते.

### ५) स्त्रीचे ‘एकांत’ प्रश्न: अंतर्मन, भीती, द्विधा:

“बाइसी एकांती पुसीलें.”[६]

समाजात वावरताना स्त्रियांवर अनेक बंधने होती, त्यामुळे त्या आपले वैयक्तिक किंवा गुंतागुंतीचे प्रश्न सार्वजनिक रित्या मांडू शकत नव्हत्या. 'एकांतात विचारणे' ही बाब स्त्रीच्या मनातील असुरक्षितता किंवा खाजगी समस्यांकडे निर्देश करते. गुरुंवर असलेल्या विश्वासामुळेच त्या आपले अंतर्मन मोकळे करू शकत होत्या.

International Journal of Advanced Research and Multidisciplinary Trends (IJARMT)
An International Open Access, Peer-Reviewed Refereed Journal
Impact Factor: 6.4 Website: https://ijarmt.com ISSN No.: 3048-9458

'एकांतात प्रश्न विचारणे' हा अत्यंत अर्थपूर्ण संकेत आहे. सार्वजनिक चौकटीत अनेक प्रश्न विचारणे अवघड असणे, लाज, भीती, दडपण असणे, किंवा सामाजिक नियंत्रणामुळे थेट बोलता न येणे या सर्व गोष्टींची छटा या कृतीतून दिसते. एकांतात प्रश्न विचारणे म्हणजे स्त्रीच्या खाजगी विश्वात संघर्ष, शंका, भीती, कुतूहल किंवा विवंचना आहेत आणि त्यांना उत्तर शोधण्याची तिची गरजही आहे. त्यामुळे स्त्री फक्त सहन करणारी न राहता समजून घेऊ पाहणारी, मार्ग शोधणारी व्यक्तिरेखा म्हणून उभी राहते. या नोंदी स्त्रीमनाचे सूक्ष्म दस्तऐवजीकरण करतात.

**६) आरोग्य–अस्वस्थता व स्त्रीची काळजी:**

"श्रीमूर्ती घामैली...
वांति स्वीकली."[७]

जेव्हा गुरूंच्या किंवा स्वामींच्या प्रकृतीमध्ये बदल होत असे, तेव्हा स्त्री-शिष्यांची होणारी धांदल किंवा चिंता त्यांच्या संवेदनशील स्वभावाचे दर्शन घडवते. आजारपणात काय उपचार करावेत, सेवा कशी करावी, याबद्दलची त्यांची जागरूकता ही त्या काळातील लोकसमज आणि आरोग्यविषयक जाणिवेचा भाग आहे.

आरोग्य-अस्वस्थता, घाम येणे, उलटी, थकवा इ. प्रसंगांत स्त्रीची तत्परता दिसते. ही तत्परता केवळ सेवाभावापुरती मर्यादित नसून काळजी घेणे, योग्य ते करणे, मार्ग विचारणे अशा सक्रिय जबाबदारीचे लक्षण आहे. घरातील आरोग्य-व्यवस्थेचा पहिला आधार अनेकदा स्त्रीच असते हे मध्ययुगीन समाजात विशेषत्वाने खरे ठरते. त्यामुळे अशा प्रसंगांत स्त्रीचे व्यक्तिमत्त्व 'समर्थ व्यवस्थापक' म्हणून उलगडते: ती परिस्थिती ओळखते, प्रतिक्रिया देते, आणि गरज पडल्यास निर्णयासाठी मार्गदर्शन घेते. या सर्वातून स्त्रीतील नेतृत्वगुणांचा सूक्ष्म प्रत्यय येतो.

निष्कर्ष:

लीळाचरित्रमध्ये स्त्रीचे चित्रण केवळ प्रसंगाच्या पार्श्वभूमीपुरते न राहता तिच्या सक्रिय भूमिकांसह समोर येते. ती भक्त म्हणून दर्शन, अर्पण व दानाच्या माध्यमातून धार्मिक प्रवाहाशी जोडलेली दिसते; शिष्या म्हणून गुरुसान्निध्यात प्रश्न विचारून मार्गदर्शन घेते; आणि गृहव्यवस्थापक म्हणून आसन-व्यवस्था, पाहुणचार, अन्नपान यांचे नियोजन करत घरातील प्रतिष्ठा जपते. शिष्टाचाराचे नियम पाळताना तिच्या वर्तनातून त्या काळाची संस्कृती, विनय आणि शिस्त व्यक्त होते. दैनंदिन श्रम उदा. पाणीभात करणे हे केवळ काम म्हणून न येता स्त्रीच्या जगण्याचा अविभाज्य भाग म्हणून ग्रंथात उमटते, त्याचवेळी ती सामाजिक संवादातही सहभागी असल्याचे संकेत मिळतात. विशेषतः 'एकांतात प्रश्न

विचारणे' ही कृती स्त्रीच्या खाजगी विश्वातील द्विधा, भीती किंवा संघर्ष सूचित करते; म्हणजेच तिच्या मनोगतांना जागा असल्याचे दिसते. आरोग्यविषयक प्रसंगात तिची तत्परता केवळ सेवा नसून जबाबदारी, काळजी आणि निर्णयक्षमतेचे लक्षण ठरते. म्हणूनच लीळाचरित्र स्त्रीजीवनाच्या मर्यादा, नियम, चौकट आणि सहभाग भक्ती, व्यवस्थापन, संवाद या दोन्ही बाजू एकत्र नोंदवून स्त्रीचे अधिक वस्तुनिष्ठ, बहुआयामी दर्शन घडवतो.

**संदर्भ ग्रंथ:**

१. पाटील डॉ. बी. एन्., प्राचीन महाराष्ट्र वाङ्मय वैभव. प्रशांत पब्लिकेशन्स्, जळगाव, पृ.क्र. १९२-१९३.
२. म्हाइंभट, लीळाचरित्र (विकिस्रोत आवृत्ती).
३. डॉ. वा. भा. कोलते, लीळाचरित्र (संपादित आवृत्ती).
४. महाराष्ट्र शासन, मराठी साहित्याचा आरंभ (मराठी भाषा विभाग).
५. https://mr.wikipedia.org/wiki/_लीळाचरित्र
६. www.leelacharitra.co.in मराठी विकिपीडिया, लीळाचरित्र विषयक परिचय.
७. https://oldisrj.lbp.world/UploadedBData/1152.pdf
Review of Research Journal, Indian Streams Research Journal ISSN:-2230-7850 (कुलकर्णी नीलिमा, लीळाचरित्र एक परीक्षण)